# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक २४५ वा रविवार दि.०३ मार्च २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# लातूर मनपाचा कारभार प्रशासक मनोहरे अभियंता केंद्रे हे पारदर्शकपणे चालवीत असताना राजकीय नेते - गुत्तेदारांचा आडसर कशाला!

लातूर:– लातूरचे जिल्हा प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्थेचा कारभार पारदर्शक नियमीत चालू असतानाही काही विघ्न संतोषी लोक राजकीय खूळ पांघरून खऱ्या वास्तव कार्यात अडसर करत असतात, असाच प्रकार लातूर महानगरपालिकेत होताना दिसते आहे. मार्च अखेर असल्याने शहरी विकासाची कामे पूर्ण करावी लागतात. त्यामुळे लातूर महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त बाबासाहेब मनोहरे आणि शहर नगर अभियंता नवनाथ केंद्रे यांनी विकासात्मक कामासाठीच्या कोऱ्या निवेदासाठी गुतेदारांना आवाहन केले त्यामुळे दलितोत्तर ४२ कामे नगरोत्थानचे १५२ कामे दलित वस्ती सुधार योजनेचे २२२ कामे अशा कार्या – कामासाठी निविदा स्वीकारणे हे काम २३ फेब्रुवारी ते १ मार्च २०२४ पर्यंत काम चालू होते. ती पारदर्शक कारभाराची पद्धतच अनेकांना पटली नसल्याने अनेक राजकीय पक्षाच्या नेत्यांनी – गुत्तेदाराने रात्री बे रात्री अभियंता केंद्रे यांच्या घरी जाऊन धमकावले असतानाही केंद्रे यांनी लातूर मनपाचे आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोह रे यांच्या पारदर्शक न्यायिक मार्गदर्शनाखाली चोख कारभार सांभाळला असून अभियंता केंद्रे व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी जीव मुठीत घेऊन कार्य सोयस्कर केले अशी चर्चा मनपा वर्तुळात होताना दिसते आहे. लातूर महानगरपालिकेत काँग्रेस, भाजपाची अर्धी –अर्धी सत्ता होती. त्यामुळे नगरसेवक आणि त्यांचे लागेबांधे गुत्तेदार यांच्यात जुळवा जुळवा असल्याने नियमानुसार निविदाप्रमाणे दलितोत्तर,नगरोत्थान, दलित वस्ती सुधार योजनेतील कामे देणे बंधनकारक असताना एकाच गुथेदाराला तिन्ही ठिकाणी दावा किंवा एकालाच तीन तीन ठिकाणी कामाची मागणी यामुळे शहर अभियंता एन के केंद्रे यांनी नियम दाखविला तर त्यांना धमकी देणे वगैरे प्रकार सुरू झाले असले तरी मनपा प्रशासक, आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या सल्ल्याशिवाय केंद्रे यांनी कागद पुढे हलविला नाही परंतु एका व्यक्तीने मंत्र्याचे नाव पुढे करून कोऱ्या निविदा विकण्याचा संबंधिताना मिळवून देण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा असली तरी पारदर्शक कारभारी आयुक्त बाबासाहेब मनोहरे आणि शहर नगर अभियंता एन के केंद्रे हे प्रकट झाले नसून लातूरचा सर्वांगीण विकास साध्य करणार असल्याचीच भूमिका समोर येते आहे. लातूर शहर नगर अभियंता केंद्रे हे आजारी असतानाही वेळेला महत्व देऊन औषध उपचार घेतच मनपाचा कारभार सांभाळत असून प्रशासक तथा आयुक्त बाबासाहेब मनोहरे हे मनपाच्या सर्व विभागावर लक्ष केंद्रित करून शहराचा विकास साधण्यासाठी कार्यरत असल्याने असे प्रशासक तथा आयुक्त बाबासाहेब मनोहरे हे आणि मनपाचे शहर अभियंता नवनाथ केंद्रे असावेत अशीच अपेक्षा व्यक्त होताना दिसते आहे.





## डॉ. आंबेडकर पार्क येथे ७५ फुटी बाबासाहेबांचा पुतळा भूमिपूजन; खा. सुधाकर शृंगारे यांचा स्तुत्य उपक्रम

लातूर:– आंबेडकरी चळवळीचे लातूर हे एक केंद्र बनलेले आहे. अशा लातूर शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७५ फुटी खुर्चीस्थित पुतळा लातूर लोकसभा राखीव मतदारसंघाचे खासदार सुधाकर शृंगारे यांच्या पराकाष्ठेतून त्यांच्याच निधीतून साकारला जातो आहे. त्या दैदिप्यमान पुतळा निर्णयाचे भूमिपूजन १मार्च रोजी धम्म सेवक महाथेरो मुळावा आणि भिक्खू समूहाच्या हस्ते करण्यात आला आणि उपस्थित जनसमुदायाने खा. सुधाकर शृंगारे यांना मनापासून धन्यवाद दिल्याचे चित्र दिसत होते. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर होण्यापूर्वीच पुतळा उभारणीचे काम सुरू केल्याने खासदार सुधाकर शृंगारे यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रति असलेले कृतज्ञता स्पष्ट होते असे लोकचर्चा करीत असताना दिसत होते विशेष म्हणजे भाजपा किंवा खासदार असल्याचा आव न आणता स्थानिक नेत्यांना समवेत घेऊन लातूर येथील आंबेडकरी जनतेच्या साक्षीने ७५ फुटी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा खुर्ची स्थित पुतळा लातूरात उभारला जातोय हेच आंबेडकरी जनतेचे भाग्य आणि खा. सुधाकर शृंगारे परिवारांची बाबासाहेबाप्रतीची पुण्याईची उतराई ठरावी असेच लोक चर्चा करीत असताना दिसत होते.



## पंतप्रधान मोदी पुन्हा वाराणसीतून रिंगणात; भाजपकडून १९५ उमेदवारांची घोषणा

नवी दिल्ली : लोकसभेच्या आगामी निवडणुकीसाठी भाजपकडून उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली. राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे आणि इतर प्रमुख नेत्यांनी पत्रकार परिषद घेऊन याबाबत घोषणा केली. राष्ट्रीय अध्यक्ष, प्रदेशची निवडणूक समिती यांच्यात चर्चा झाली. त्यानंतर अंतिम चर्चा ही २९ फेब्रुवारीला झाली.

यावेळी १६ राज्य आणि २ केंद्र शासित प्रदेशातील १४५ जागांचा निर्णय झाला. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी वाराणसी येथून निवडणूक लढवणार आहेत. ३४ केंद्रीय मंत्री आणि राज्यमंत्री यांचे नाव या यादीत आहे. लोकसभा अध्यक्षांचे नाव आहे आणि एका माजी मुख्यमंत्र्यांचे नाव आहे. यामध्ये २८ मातृशक्ती (महिला), ५० पेक्षा कमी वयाचे ४७ युवा उमेदवार, अनुसूचित जाती २७, अनुसूचित जनजाती १८, ओबीसी ५७ अशा विविध वर्ग, समाज आणि जातींना या यादीत प्रतिनिधित्व देण्यात आले आहे'', अशी माहिती विनोद तावडे यांनी दिली.



भौगोलिक क्षेत्र मोठे, प्रदेशात आम्ही मोठे, यासोबत एनडीएचा विस्तार करण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. जनतेच्या आशीर्वादाने आम्ही सलग तिस–यांदा निवडून येऊ. गेल्या दोन निवडणुकांपेक्षा जास्त जागांवर आम्ही निवडून येऊ, असे विनोद तावडे म्हणाले.

उत्तर प्रदेशच्या ५५ जागांची आम्ही घोषणा करत आहोत, प. बंगालच्या २६, मध्यप्रदेश २४, गुजरात १५, राजस्थान १५, केरळ १२, तेलंगणा ९, आसाम १४ पैकी ११, झारखंड ११, छत्तीसगड ११, दिल्ली ५, जम्मू–काश्मीर २, उत्तराखंड ३, अरुणाचल प्रदेश २, गोवा १, त्रिपुरा १, अंदमान निकोबार १, दिव–दमन १, अशा १९५ जागांची आम्ही घोषणा करत आहोत, असे विनोद तावडे यांनी सांगितले.

वाराणसी येथून नरेंद्र मोदी, अंदमान निकोबार येथून बिष्णू पडा रे, अरुणाचल प्रदेश पूर्वमधून किरण रिजिजू, अरुणाचल प्रदेश पश्चिममधून तापिर गाओ, आसाम करिमगंजमधून अनुसूचित जातीकडून कृपानाथ मल्ला, सिलचरमधून परिमल शुक्ला बैद्य, ऑटोनमस जिल्हा शेड्यूल ट्राईब अरमसिंग इसो निवडणूक लढवणार आहेत, अशी माहिती विनोद तावडे यांनी दिली.

## ८५ वर्षपेक्षा कमी वयाच्या व्यक्तींना मतदान केंद्रावरच मतदान करता येणार

नवी दिल्ली : केंद्र सरकारने निवडणूक आयोगाशी सल्लामसलत केल्यानंतर निवडणूक आचार नियम (१९६१) मध्ये सुधारणा केली आहे. केंद्र सरकारने पोस्टल बॅलेटद्वारे मतदान करण्याची वयोमर्यादा ८० वरून ८५ वर्षे केली आहे. म्हणजेच आता ८५ वर्षांखालील वृद्धांना मतदानासाठी मतदान केंद्रावर जावे लागणार आहे. यापूर्वी ८० वर्षांवरील वृद्धांना पोस्टल बॅलेटची सुविधा होती.केंद्र सरकारने निवडणूक आयोगाशी सल्लामसलत केल्यानंतर शुक्रवारी निवडणूक आचार नियम (१९६१) मध्ये सुधारणा केली. गेल्या ११ विधानसभा निवडणुकीत ज्येष्ठांच्या मतदानाचा पॅटर्न लक्षात घेऊन सरकारने हा बदल केला आहे. या निवडणुकांमध्ये ८० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या ९७ ते ९८ टक्के वृद्धांनी पोस्टल बॅलेटद्वारे मतदान करण्याऐवजी मतदान केंद्रांवर जाऊन मतदान करणे पसंत केले. हे लक्षात घेऊन सरकारने २०२० मध्ये केलेल्या या तरतुदीत सुधारणा केली आहे.निवडणूक संचालन नियमांच्या नियम २७ अ नुसार, ८० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक, अपंग व्यक्ती, निवडणूक कर्तव्यावर तैनात असलेले कर्मचारी आणि सैन्य दलातील जवानांसाठी पोस्टल बॅलेटची सुविधा प्रदान करण्यात आली आहे. २०२० च्या बिहार विधानसभा निवडणुकीत कोविड–संक्रमित व्यक्तींनाही ही सुविधा महामारीच्या काळात देण्यात आली होती.

## पानगावचे हेमाडपंथी विठ्ठल मंदिर नव्या रूपात आ. रमेशआप्पा कराड यांच्यामुळे ओळखले जाईल

### दहा कोटीचा निधी मंजूर केल्याने आ. कराड यांचे आभार व्यक्त

लातूर :– आयोध्येत प्रभू श्रीराम मंदिराची भव्य दिव्य उभारणी करून पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांनी वर्षानुवर्ष रामभक्तांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण केले त्याच पद्धतीने पानगाव येथील पुरातन हेमाडपंथी श्री विठ्ठल मंदिराचा जीर्णोद्धार व्हावा यासाठी दहा कोटीचा निधी मिळवून दिल्याने येणाऱ्या काळात नव्या रूपातील हे मंदिर आ. रमेशआप्पा कराड यांच्यामुळेच ओळखले जाईल अशी भावना व्यक्त करून पानगाव आणि परिसरातील नागरिकांनी आ. कराड यांचा यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले.

रेणापूर तालुक्यातील मौजे पानगाव येथील पुरातन हेमाडपंथी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या जतन व दुरुस्ती कामासाठी भाजपाचे नेते आ रमेशआप्पा कराड यांनी तब्बल ९ कोटी ३४ लक्ष रुपयाचा निधी मंजूर करून आणल्याबद्दल पानगाव आणि परिसरातील नागरिकांच्या वतीने लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात शनिवारी यथोचित सत्कार करून आ. कराड यांचे आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक व्यंकटराव अनामेमामा, मंदिर ट्रस्टचे प्रदीप कुलकर्णी, माजी उपसभापती अनंत चव्हाण, माजी सरपंच सुकेश भंडारे, माजी जिप सदस्य ईश्वर गुडे, चंद्रकांत आरडले यांची प्रमुख उपस्थिती होती.

पानगाव येथील हेमाडपंती श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे जतन व्हावे या मंदिराचा जिर्णोद्धार आणि सर्वांगीण विकास व्हावा याकरिता भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी




राज्याचे उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब, राज्याचे पर्यटन विकास मंत्री मा. सुधीरभाऊ मुनगंटीवार आणि पुरातन विभागाच्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याची वेळोवेळी प्रत्यक्ष भेट घेऊन पाठपुरावा केला. राज्य शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागाने नमो तीर्थस्थळ सुधार अभियान माध्यमातून राज्यातील ७३ ऐतिहासिक व पुरातन मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचा निर्णय घेतला आ. कराड यांच्या पाठपुराव्यामुळे पानगावच्या विठ्ठल मंदिराचा या योजनेत समावेश करण्यात आला असून या मंदिराच्या जतन व दुरुस्ती कामासाठी ९ कोटी ३४ लक्ष ४९ हजार ९३४ खर्चाच्या निधीस राज्याच्या पर्यटन विभाग मंत्रालयाने १ मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता दिली आहे.

पानगाव आणि परिसरातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या आणि प्रति पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या भाविक भक्तांनी या मंदिराचे पाहिलेले स्वप्न आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून पूर्ण होत असल्याची भावना व्यक्त करून पानगाव आणि परिसरातील मंदिर ट्रस्ट ग्रामस्थ भाविक भक्ताच्या वतीने यथोचित सत्कार करून आ. कराड यांचे आभार व्यक्त केले.

यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की रेणापूर आणि पानगाव परिसरावर लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचे अतोनात प्रेम होते. तेवढे प्रेम मला करता नाही येणार पण त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून काम करतोय. पानगावकरांनी आजपर्यंत जे जे मागितले देण्याचा प्रयत्न केला असून या पुढील काळातही विकास कामांना निधीची कमतरता पडू देणार नाही अशी ग्वाही देऊन लवकरच पानगाव येथील मुस्लिम बांधवांसाठी शादी खाना बांधकामा करिता ५० लाखाचा निधी मिळवून देणार असल्याचे बोलून दाखविले.

पानगाव आणि भादा या दोन ठिकाणीचे ग्रामीण रुग्णालय आचारसंहिता लागण्यापूर्वी मंजूर होण्याची शक्यता असल्याची माहिती दिली. गावच्या आणि परिसराच्या विकास कामासाठी गावकऱ्यांनी एकत्र येऊन काम करावे अशी सूचना करून देशाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि प्रगतीसाठी विकास पुरुष मा. नरेंद्रजी मोदी साहेब यांना समर्थन देण्यासाठी लातूरचा भाजपाचा खासदार रेकॉर्ड ब्रेक मताधिक्क्याने विजय व्हावा यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे अवाहन आ. रमेशआप्पा कराड यांनी यावेळी केले.

यावेळी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, पानगाव शहराध्यक्ष गणेश तूरूप, भागवत गीते, गोपाळ शेंडगे वामन संपत्ते, सुरेंद्र हरिदास, मारुती गालफाडे शिवाजी जाधव, बब्रुवान संपत्ते, जब्बार शेख, सतीश कुलकर्णी, ललिता कांबळे, शीला आचार्य, नाथराव गीते, बाळू केंद्रे, योगीराज, शिरसाट, राम भंडारे, गोविंद नरहारे, बंडू केंद्रे, मुन्ना कुलकर्णी, बाबुराव कस्तुरे, हरिभाऊ आचार्य यांच्यासह पानगाव आणि परिसरातील भाजपाचे पदाधिकारी, नागरिक विठ्ठल मंदिराचे भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय....

# 'नाइट फ्रँक'

कोणत्याही देशाची श्रीमंती त्या देशात अब्जाधीश किती राहतात यावर मोजणे चांगले की त्या देशातील सर्वसामान्य नागरिकांचे सरासरी उत्पन्न किती, त्यांचे राहणीमान कसे यावर मोजणे योग्य, हा प्रश्न नव्याने पडण्याचे कारण म्हणजे 'नाइट फ्रँक' या जागतिक गृह–वित्त सल्लागार संस्थेचा ताजा अहवाल. नाइट फ्रँक ही सव्वाशे वर्षांहूनही अधिक वर्षांपूर्वी लंडनस्थित संस्था असून स्थावर आदी मालमत्तेबाबतचे या संस्थेचे अहवाल जागतिक पातळीवर गांभीर्याने घेतले जातात. या संस्थेचा 'वेल्थ रिपोर्ट २०२४' नुकताच प्रकाशित झाला. जगभरातील जवळपास सर्व देशांतील नागरिकांची वित्तस्थिती, त्या त्या देशांतील श्रीमंत, महाश्रीमंत, त्यांची जीवनशैली, त्यांचे गुंतवणुकीचे पर्याय, गृहमालमत्ता क्षेत्रातील बदल अशा अनेकांगांनी 'नाइट फ्रँक'च्या या अहवालात विचार केला जातो. त्यासाठी आवश्यक ती प्रत्यक्ष पाहणी करून भविष्यवेधी निष्कर्ष मांडले जातात. कोणत्याही पाहणीच्या विश्वासार्हतेसाठी आवश्यक असते ती वास्तव विदा, म्हणजे डेटा. अशा विविधांगी विदाचा अभाव असेल तर अहवालांची शास्त्रीयता धोक्यात येऊन ते अहवाल केवळ स्वप्नरंजन ठरण्याचा धोका असतो. तो 'नाइट फ्रँक'च्या अहवालाबाबत कमी होतो. आवश्यक ती विदा हे जसे त्यामागील एक कारण. तसेच दुसरे म्हणजे या अहवालाचे उद्दिष्ट. कोणत्या एखाद्या देशातील सत्ताधाऱ्यांस खूश/नाखूश करण्याचा हेतू या संस्थेच्या पाहण्यांमागे नसल्याने त्यांचे मोल वाढते आणि म्हणून त्या अहवालांवर साधक–बाधक चर्चा झडते. 'नाइट फ्रँक'चा ताजा अहवाल त्याच मालिकेतील आणि तशाच दर्जाचा असल्याने त्याची दखल घेणे महत्त्वाचे. या अहवालानुसार आगामी चार वर्षांत, म्हणजे २०२८ पर्यत, महा–धनिकांची संख्या वाढण्याचा वेग जगात सर्वात कोणत्या एका देशात असेल तर तो म्हणजे भारत. महाधनिक म्हणजे ज्यांची संपत्ती किमान तीन कोटी डॉलर्स इतकी वा अधिक आहेत असे. सध्या एका अमेरिकी डॉलरचे मोल ८३ रुपयांच्या आसपास धरल्यास तीन कोटी डॉलर्सच्या संपत्तीचे भारतीयीकरण करता येईल. या अहवालाच्या मते आगामी चार वर्षांत इतकी वा याहूनही अधिक संपत्ती असलेल्या भारतीयाच्या संख्येत तब्बल ५० टक्क्यांनी वाढ होईल. आजमितीस या इतक्या संपत्तीचे मालक असलेल्यांची संख्या १३,२६३ इतकी आहे. आगामी चार वर्षांत ती १९,९०८ इतकी होईल. अशा तऱ्हेने कुबेरांची संख्या भारतात झपाट्याने वाढेल. हा वाढीचा वेग भारतात सर्वाधिक राहणार असून त्या खालोखाल क्रमांक असेल तो आपल्या शेजारील चीनचा. या आपल्या स्पर्धक देशातील धनाढ्य या काळात ४७ टक्क्यांनी वाढतील आणि तिसऱ्या क्रमांकावरील टर्की या देशात अशा कुबेरांच्या वाढीचा वेग ४२.९ टक्के इतका असेल. यानंतर चवथा क्रमांक पुन्हा एकदा आशियाई देशाकडे जाईल. हा देश म्हणजे मलेशिया. त्या देशातील धनाढ्यांत आगामी चार वर्षांत ३५ टक्क्यांची वाढ होईल. हे अहवालकर्ते अशा धनाढ्यांत पहिल्या क्रमांकावर भारत असेल याचे श्रेय देशाच्या वाढत्या विकास वेगास देतात. प्रतिवर्षी सहा–साडेसहा टक्के इतक्या वेगाने आपल्या अर्थव्यवस्थेचा प्रसार होत असून त्यामुळे भारतातील धनिकांच्या संपत्तीची वाढ अधिक वेगाने होते असे या अहवालकर्त्यांस वाटते. त्यात गैर काही नाही. काही महत्त्वाच्या देशांतील अर्थवाढ, उदाहरणार्थ अमेरिका जेमतेम दोन–अडीच टक्के, चीन पाच टक्के, जपान मंदीत फसलेला आणि ग्रेट ब्रिटनही त्या दिशेने निघालेला, अशी मंद असल्याने भारताचा विकास वेग दिलखेचक वाटू शकतो.

तो आहेही. पण असा मर्यादित विचार केला तरच! या विचाराच्या जोडीने त्या त्या देशांच्या अर्थव्यवस्थेचा आकार लक्षात घेतल्यास त्यांचे एक–दोन टक्के आपल्या सात–आठ टक्क्यांस कसे भारी आहेत हे सहजपणे लक्षात येते. अमेरिकेची अर्थव्यवस्था साधारण २० लाख कोटी डॉलर्सच्या घरात आहे तर चिनी अर्थव्यवस्था आठ लाख कोटी डॉलर्सच्या आसपास आहे. या तुलनेत भारतीय अर्थव्यवस्थेचा आकार तीन लाख कोटी डॉलर्सचा मानला जातो. याचा अर्थ चीनची अर्थव्यवस्था आपल्यापेक्षा अडीच पटींनी अधिक आहे तर अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेचा आकार आपल्यापेक्षा साधारण सातपट मोठा आहे. हे फक्त झाले अर्थव्यवस्थेच्या आकाराचे वास्तव. अधिक खोलात जाऊन या तीनही देशांतील नागरिकांचे दरडोई उत्पन्न पाहू गेल्यास केवळ अर्थव्यवस्थेचा आकार आणि वाढीचा वेग यांवरच आनंद व्यक्त करण्यातील फोलपणा कुणाच्याही सहज लक्षात यावा. म्हणजे भारतीयाचे दरडोई उत्पन्न २,६१२ डॉलर्स इतके आहे तर चीनचे सरासरी १९,१६० डॉलर्स आणि अमेरिकेत तर ते ७०,४८० डॉलर्स इतके आहे. याचा साधा अर्थ असा की सर्वसामान्य चिनी नागरिक सर्वसामान्य भारतीयाच्या तुलनेत साधारण दहा पट अधिक कमावतो आणि सर्वसामान्य अमेरिकनाचे उत्पन्न तर भारतीयाच्या तुलनेत ३५ पट जास्त आहे.

या वास्तवाच्या पार्श्वभूमीवर भारतातील वाढती अब्जाधीश संख्या काय दर्शवते हा खरा प्रश्न. त्याच वेळी लक्षात घ्यायला हवी अशी आणखी एक बाब म्हणजे या संभाव्य अब्जाधीश वाढीच्या यादीतील देशांची उपस्थिती. यात पहिल्या पाचांत एकही विकसित म्हणता येईल असा देश नाही. ना अमेरिका ना स्वित्झर्लंड ना अन्य कोणता युरोपीय देश. यातले पहिले तीन देश आहेत ते भारत, चीन आणि टर्की. निदान अब्जाधीश निर्मिती वेगाच्या मुद्द्यावर तरी आपण चीनला मागे टाकले असले तरी हे वास्तव अभिमान बाळगावे आहे असे आहे काय? टर्की या देशातील वास्तवाविषयी त्या देशाचे नैसर्गिक सौंदर्य आणि इतिहास वगळता बरे बोलावे असे काही नाही. असा देश अब्जाधीश निर्मितीत वेग घेतो आणि मलेशियासारखा एकारलेला देश चौथ्या क्रमांकावर येऊन पोहोचतो हे सत्य त्या त्या देशांतील व्यवस्थांविषयी सूचक भाष्य करते. हे भाष्य प्रामाणिक म्हणता येईल अशा परदेशी सल्लागार सेवेच्या पाहणीतून पुढे येत असल्याने आपल्या धोरणकर्त्यांनी त्याची दखल स्वत:हून घ्यायला हवी. कारण यातून आपल्याकडील कमालीच्या आर्थिक विषमतेचे विदारक दर्शन घडते. यावरून आपल्या देशातील 'आहे रे' वर्गाकडेच अधिकाधिक संपत्तीचे केंद्रीकरण कसे होते आणि 'नाही रे' वर्गाकडे आहे ते अधिकाधिक नाहीसे कसे होते हे दिसून येते. म्हणून अब्जाधीश वाढीचा वेग सर्वाधिक आहे याचा कितपत अभिमान आपण बाळगावा हा प्रश्न. तो पडतो कारण व्यापक रोजगारनिर्मिती हे आपले आव्हान आजही कायम आहे, किंबहुना ते अधिकच गहिरे होताना दिसते.

# अतिक्रमण फक्त मुस्लीमच करतात का? हे बुलडोझर राज नाही तर काय आहे?

दिल्ली डेव्हलपमेंट ऑथॉरिटीने (डीडीए) यावेळी वकील हसनचं घर पाडलं, म्हणून दखल तरी घेतली जातेय. पण याआधीही याच प्राधिकरणाने जहांगिरपुरी, मेहरौली, संगम विहारसह अनेक ठिकाणी अशा कारवाया केल्या आहेत आणि योगायोगाने यातल्या बहुसंख्य मालमत्तांचे मालक मुस्लीमच आहेत. मशीद आणि मदरसेही या कारवायांतून सुटलेले नाहीत. महाराष्ट्रातल्या मीरा– भाईंदरमध्येही राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठेच्या सुमारास अशीच कारवाई झाली. मुस्लिमांची घरं दुकानं पाडण्यात आली. राम नवमी, हनुमान जयंतीच्या वेळी उत्तराखंडमध्ये, मध्यप्रदेश आणि गुजरातमध्येही अशा घटना घडल्या होत्या. 'योगायोगाने' ही सर्व राज्य भाजप शासित किंवा भाजपच्या अखत्यारीत (केंद्रशासित दिल्ली) आहेत.

अगदी मागच्याच महिन्यातली गोष्ट आहे. उत्तराखंडमधल्या हलद्वानी शहरात एक मदरसा आणि मशीद होती. तिच्यावर कारवाई संदर्भात नोटीस बजावण्यात आली. सफिया मलिक त्याविरोधात उच्च न्यायालयात गेल्या. ही जागा आपल्या पूर्वजांना लिजवर मिळाली होती. लिजच्या नूतनीकरणासाठी जिल्हा प्रशासनाकडे २००७पासून अर्ज आणि पाठपुरावा करण्यात आला आहे. मात्र अद्याप प्रक्रिया करण्यात आलेली नसल्याने कारवाईपासून अंतरिम दिलासा द्यावा असं सफिय यांचं म्हणणं होतं. न्यायालयाने पुढच्या सुनावणीपर्यंत कारवाईला स्थगिती दिली. मात्र हलद्वानी प्रशासन पुढच्या सुनावणीपर्यंत थांबलंच नाही आणि कारवाई करून मोकळं झालं. मेहरौलीत एक सातशे वर्षं जुनी मशिद होती. संजय वन या वन विभागाच्या जागेत येत असल्याचं कारण देत ती यावर्षी ३० जानेवारीला जमीनदोस्त करण्यात आली. या मशिदीशी संलग्न एक मदरसाही होता. तिथे काही अल्पवयीन मुलं राहत होती. त्यांना बाहेर काढण्यात आलं. त्यांची वह्या–पुस्तकंही घेऊ दिली नाहीत, असं त्यांचं म्हणणं आहे. मशीद व मदरशावर बुलडोझर चालवण्यात आला. दिल्ली वक्फ बोर्डाने याविरोधात न्यायालयात दाद मागितली असता १२ फेब्रुवारी रोजी दिल्ली उच्च न्यायालयाने जैसे थे स्थिती राखण्याचे आदेश दिले.

गतवर्षी हरियाणातल्या नुहमध्ये झालेल्या दंगलीनंतर तिथे घरं आणि दुकानं मिळून मुस्लिमांच्या तब्बल ७५० मालमत्ता जमीनदोस्त करण्यात आल्या होत्या.

ऑक्टोबर २०२३ मध्ये मथुरेत रेल्वेच्या प्रकल्पासाठी नई बस्ती भागातली १३५ घरं पाडण्यात आली. मंदिराच्या परिसरात वसलेली ही हिंदू मुस्लीम अशी मिश्र वस्ती होती. सर्व घरं ५०–६० वर्ष जुनी होती. त्यातल्या केवळ मुस्लिमांच्या घरांवरच कारवाई करण्यात आल्याचं रहिवाशांचं म्हणणं होतं.

एप्रिल २०२२मध्ये राम नवमी आणि हनुमान जयंतीच्या काळात अनेक ठिकाणी दंगली उसळल्या. सगळीकडे साधारण सारखीच कारणं होती. दिल्लीतल्या जहांगिरपुरी या मुस्लीमबहुल भागातून १६ एप्रिलला तीन शोभा यात्रा काढण्यात आल्या. त्यातल्या तिसऱ्या शोभायात्रेला पोलिसांची परवानगी नव्हती. ही यात्रा आधीच्या दोन यात्रांच्या मार्गाने न जाता वेगळ्या मार्गाने गेली आणि मशिदीसमोर थांबली. मोठ्या आवाजात गाणी सुरू होती. भावना भडकवणाऱ्या घोषणा दिल्या जात होत्या. मुस्लिमांच्या मते सहभागी व्यक्तींनी त्यांच्या धार्मिक भावना दुखावण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याकडे त्रिशूळ तलवारी हॉकी स्टिक्स होत्या. त्यामुळे मुस्लिमांनी दगडफेक केली. हिंदूंच्या मते केवळ धार्मिक प्रतिकं म्हणून ही शस्त्र बाळगण्यात आली होती. पण उसळलेल्या दंगलीचा परिणाम असा झाला की पालिका प्रशासनाने ज्या रस्त्यावर दंगल झाली तिथली घरं आणि दुकानं जमीनदोस्त करण्याचे आदेश दिले. दुसऱ्याच दिवशी सकाळी ९.३० वाजता नऊ बुलडोझर पालिका कर्मचाऱ्यांच्या १४ तुकड्या आणि १५०० पोलीस जहांगिरपुरीत दाखल झाले.

रहिवाशांच्या वकिलांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सरन्यायाधीशांनी पुढील सुनावणीपर्यंत जैसे थे आदेश दिले. पण आदेश आमच्यापर्यंत पोहोचलेच नाहीत, अशी सबब देत कारवाई सुरू ठेवण्यात आली. सीपीआय(एम)च्या वृंदा करात यांनी आदेशाची प्रत मिळवली आणि घटनास्थळी पोहोचून कारवाई रोखली. पण तोवर २० दुकानं आणि मशिदीचा दर्शनी भाग पाडण्यात आला होता. या भागात पूर्वीपासून हिंदूही राहत होते. दोन्ही समाजांनी एकमेकांना साथ देत हा वाद मिटवला.

दिल्लीच्या घटनेची पुनरवृत्ती उत्तराखंडमधल्या रुरकीमध्ये आणि मध्यप्रदेशातही झाली. हनुमान जयंतीनिमित्त काढण्यात आलेली मिरवणूक मशिदीच्या दारात पोहोचली असता मोठ्या आवाजात धार्मिक गाणी लावण्यात आली. रोजा सोडण्याची वेळ झाल्यामुळे मिरवणूक पुढे न्यावी असं मुस्लिमांचं म्हणणं होतं. त्यावरून दगडफेक सुरू झाली. दुसऱ्या दिवशी पोलीस बुलडोझर घेऊन आले. हिंसाचारात सहभागी असलेल्यांनी स्वतःला पोलिसांच्या स्वाधीन करावं नाहीतर बुलडोझरने घरं पाडली जातील असा अजब इशारा देण्यात आला.

मध्य प्रदेशात रामनवमीच्या मिरवणुकीवर दगडफेक केल्याचा ठपका ठेवून अनेक घरं पाडण्यात आली. गुजरातमध्येही रामनवमीच्या वेळी निर्माण झालेल्या वादानंतर खंभात भागात १७ गोदाम पाडण्यात आले. सौराष्ट्र परिसरात देशविरोधी करवाया किंवा समाजविघातक कृत्य अशा सबबीखाली शेकडो मासेमारांना बेघर करण्यात आलं आहे. अनेकांचे मासेमारीचे परवानेही रद्द करण्यात आले आहेत.

२०२२ मध्येच भाजपच्या नुपूर शर्मांनी प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्याविरोधात वादग्रस्त वक्तव्य केलं आणि जगभरातला मुस्लीम समुदाय नाराज झाला. एकीकडे सरकार परदेशी मुस्लिमांसमोर दिलगिरी व्यक्त करत होतं तर दुसरीकडे आपल्याच देशात प्रयागराजमध्ये (पूर्वीचं अलाहाबाद) या अवमानाच्या निषेधार्थ आंदोलनं करणाऱ्या आफरिन फातिमाच्या घरावर बुलडोझर चालविला जात होता. तिचं घर २० वर्ष जुनं होतं – आम्ही नियमित मालमत्ता करसुद्धा भरत होतो, याआधी कधीही प्रशासनाकडून आम्हाला आमचं घर अनधिकृत असल्याचं दर्शवणारी नोटीस आली नव्हती. तरीही आम्हाला आदल्या दिवशी नोटीस देऊन दुसऱ्या दिवशी ११ वाजता कारवाई सुरू करण्यात आली – असं फातिमाचं म्हणणं आहे. आंदोलनात सहभागी झाले म्हणून आम्ही त्यांच्यावर कारवाई केली हे पोलिसांनी स्वतःच मध्यमांसमोर मान्यही केलं होतं.

राममंदिरात प्राणप्रतिष्ठा होण्याच्या आदल्या रात्री महाराष्ट्रात मिरा रोड इथल्या नाय नगर भागात असाच वाद उद्भवला. शोभायात्रेवर हल्ला झाल्याचे आरोप करण्यात आले आणि लगेचच तिथल्या झोपड्या, तिथली घरं, दुकानं जमीनदोस्त करण्यात आली. इथेही तेच दावे होते – एवढी वर्ष इथे राहतोय, व्यवसाय करतोय, आता घर गेलं, व्यवसायही प्रशासनाच्या दाव्यानुसार ही सुद्धा निव्वळ 'अतिक्रमणावरची कारवाई' होती.

### म्नेस्टी इंटरनॅशनल चा अहवाल काय सांगतो?

म्नेस्टी इंटरनॅशनल या मानवी हक्कांसाठी काम करणाऱ्या संस्थेने फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात दोन अहवाल प्रकाशित केले. त्यांची शीर्षकं होती–'तुम्ही बोललात तर तुमची घर जमीनदोस्त केली जातील' आणि 'उत्तरदायित्व– भारतात बुलडोझरद्वारे होणाऱ्या अन्यायांतील जेसीबीची भूमिका आणि जबाबदारी'. देशातल्या पाच राज्यांत बुलडोझर वापरून करण्यात आलेल्या कथित अतिक्रमण निर्मूलन कारवायांचा अभ्यास करून हे अहवाल सादर करण्यात आले होते. यात १२८ कारवायांचा अभ्यास करण्यात आला होता. त्यापैकी ३३ प्रकरणांत बुलडोझर वापरून अतिक्रमणं जमीनदोस्त करण्यात आली होती. ६१७ व्यक्ती बाधित झाल्याचं अहवालात म्हटलं होतं. संस्थेच्या मते ही अतिक्रमणांवरची कारवाई नसून अल्पसंख्याकांविरोधातील द्वेशातून घडलेले गुन्हे होते.

एखाद्या गुन्ह्याची शिक्षा म्हणून कोणाचं तरी घर पाडणं, त्याला बेघर करणं कायद्यात बसणारं नाही. त्यामुळे सरकारने या कारवाया ताबडतोब थांबवाव्यात. संबंधितांना पुरेशी भरपाई द्यावी, अशी मागणी संस्थेने केली होती. मध्यप्रदेशात शिक्षा म्हणून केल्या जाणाऱ्या बुलडोझर कारवायांचं प्रमाण सर्वाधिक ५६ एवढं असल्याचं निरीक्षण नोंदवण्यात आलं.

अशा कारवाया सामान्यपणे अनधिकृत बांधकामं हटवण्याच्या नावाखाली केल्या जातात, मात्र त्या करताना कायदे आणि मानवी हक्कांचं उल्लंघन केलं जातं. बहुतेकदा यात मुस्लीम समाजाला लक्ष्य केलं जातं आणि परिसरातल्या हिंदूंच्या मालमत्ता वगळून केवळ मुस्लिमांच्या मालमत्तांवर कारवाई केली जाते, असं निरीक्षण अहवालात नोंदवण्यात आलं होतं.

### जेसीबी कंपनीवरही जबाबदारी?

या कारवायांत वापरले जाणारे बहुतेक बुलडोझर हे जेसीबी कंपनीचे असतात. त्यामुळे जेसीबीला जिहादी कंट्रोल बोर्ड म्हणून संबोधलं जात असल्यांचही अहवालात नमूद आहे. म्नेस्टीने जेसीबी कंपनीशी संपर्क साधून या संदर्भात तक्रार केली असता, कंपनीने– आम्ही एकदा विक्री केली, की आमच्या उत्पादनांचा वापर कोणत्या कारणासाठी केला जात आहे, यावर आमचं नियंत्रण नसतं, पण म्नेस्टीच्या मते यात तथ्य नाही. युनायटेड नेशन्सच्या व्यवसाय आणि मानवाधिकारांशी संबंधित नियमावलीनुसार आपण विकलेल्या उत्पादनांचा वापर योग्य कारणांसाठी होत आहे की नाही, हे पाहणं, त्यामुळे मानवाधिकारांचं उल्लंघन होत असल्यास हस्तक्षेप करणं, ही कंपनीचीही जबाबदारी आहे. मुस्लिमांना बेघर करण्यासाठी आपल्या यंत्रांचा वापर सातत्याने होत असताना आणि त्यावर बसून लोक मुस्लिमांविरोधात घोषणाबाजी करत असताना जेसीबी कंपनी आपली जबाबदारी नाकारू शकत नाही, असं म्नेस्टीचं म्हणणं आहे.

### बुलडोझर राजचं मूळ

बुलडोझर राज ही खरंतर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची संकल्पना. ते २०१७मध्ये प्रथमच मुख्यमंत्री झाले तेव्हाच त्यांनी सांगितलं होतं की उत्तर प्रदेशमधल्या कायदा सुव्यवस्थेची स्थिती सुधारण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार. पण त्यांनी कायदाच हातात घेतला.

# भारत आणि भारतीय

'व्हेनिस बिएनाले'मध्ये यंदा भारताचं 'नॅशनल पॅव्हिलियन' नाही, असं सांगितलं काय किंवा ' व्हेनिस शहरात दर दोन वर्षांनी भरणाऱ्या चित्र/शिल्पकला महाप्रदर्शनाची ६० वी खेप येत्या एप्रिलमध्ये सुरू होईल आणि नोव्हेंबपर्यंत सुरू राहील, त्यामध्ये भारताचा 'राष्ट्रीय कलामंडपा'द्वारे सहभाग असणार नाही' अशा सविस्तर मराठी शब्दांत सांगितलं काय, यात बातमी आहे हे फार कुणाला कळणारच नाही.. मुळात तिथं भारताचा सहभाग 'सत्तर साल में' कधी म्हणजे कधीही नव्हता! सन २०१४ नंतर जो काही 'नवा भारत' घडला, त्या भारताच्या राष्ट्रीय कलामंडपाचा सहभाग मात्र २०१९ च्या व्हेनिस द्वैवार्षिक महाप्रदर्शनात होता आणि त्या वेळी मात्र 'व्हेनिसमध्ये भारताचा बोलबाला', 'आता दर खेपेला असणार व्हेनिसमध्ये भारताचा राष्ट्रीय कलामंडप' अशा प्रकारची प्रसिद्धी करण्यात आलेली होती. मग करोनामुळे २०२१ सालची व्हेनिस बिएनालेच वर्षभर पुढे ढकलण्यात आली, तेव्हा भारतानं नकार कळवला होता. मात्र ऑक्टोबर २०२३ मध्ये 'इंडिया आर्ट फेअर'च्या संकेतस्थळावर, 'भारत सरकारच्या सांस्कृतिक खात्यातर्फे २०२४ च्या एप्रिलमध्ये होणाऱ्या व्हेनिस बिएनालेमध्ये भारताचा राष्ट्रीय कलामंडप उभारण्यासाठी गुंफणकाराची (प्रदर्शन नियोजकाची) नेमणूक करणे आहे' अशा प्रकारच्या सूचना दिसू लागल्या. त्यामुळे यंदा भारताचं प्रतिनिधित्व करणाऱ्या तथाकथित स्वायत्त कला–संस्थांनी हात दाखवून अवलक्षण केलंय.. किंवा कुणाच्यातरी नाकर्ते पणामुळे ते त्यांना करावं लागलंय, हे उघड आहे. पण म्हणून काय भारत वंचित राहिलाय का?

.. त्याबद्दलचा तपशील देण्याआधी थोडं कौतुकही करू या भारतानं एकदाच व्हेनिसमध्ये सिद्ध केलेल्या राष्ट्रीय कलामंडपाचं. ते कौतुक करण्याआधी मुळात, हे व्हेनिसबिनिस एवढं का महत्त्वाचं आणि 'राष्ट्रीय कलामंडप' हा काय प्रकार, हे जरा समजून घेऊ. तर 'जागतिक चित्रशिल्प वगैरे दृश्यकलांचं ऑलिम्पिक' म्हणून व्हेनिसच्या बिएनालेला ओळखलं जातं. व्हेनिसच्या बिएनालेनंतरच जगभर २७० शहरांमध्ये अशी द्वैवार्षिक महाप्रदर्शनं भरू लागली (त्यापैकी काही बंद पडली). सन १८९५ पासून– म्हणजे चित्रकलेच्या इतिहासात 'इम्प्रेशनिझम'मुळे क्रांती घडलेली असतानाच्या काळात – दर दोन वर्षांनी व्हेनिसचं महाप्रदर्शन भरू लागलं, तेव्हा त्याची व्याप्ती युरोपपुरतीच होती. पण या देशांनी यावं, आपापल्या देशातली उच्चकोटीची कला दाखवावी, असा हेतू त्यामागे होता. वसाहतवादी युरोपीय देश त्या वेळी भारतीय उपखंडातून, इंडोचायनातून किंवा आफ्रिकेतून जुन्या कलावस्तू ढापायचे आणि 'हे आमचंच वैभव' म्हणायचे, तसल्या बनवेगिरीला व्हेनिस बिएनालेमध्ये अजिबात स्थान नव्हतं. त्यामुळे झालं असं की इम्प्रेशनिझम, एक्स्प्रेशनिझम, फॉविझम, क्युबिझम, बाउहाउस, फ्यूचरिझम.. अशा कलाविचारांवर आधारलेल्या चळवळी १९०० ते १९४० या काळात युरोपमध्ये मूळ धरत होत्या, तेव्हा त्या नव्या कलेचं प्रतिबिंब व्हेनिसमध्ये दिसायचं. पुढे १९६० च्या दशकातल्या अमेरिकी 'पॉप आर्ट'पर्यंत हे घडत्या इतिहासाचं दर्शन होत राहिलं. व्हेनिस बेटावर 'जार्दीनी द बिएनाले' हे उपवन, त्यात या युरो–अमेरिकी देशांनी कायमस्वरूपी पक्कं बांधकाम करून उभारलेले आपापले राष्ट्रीय कलामंडप, इटलीत साम्यवाद्यांचीही सत्ता आल्यामुळे रशिया, व्हेनेझुएला अशाही देशांनी या उपवनात मंडप उभारले. पुढे १९८० पासून व्हेनिस बिएनालेनं विस्तारून 'आर्सेनाले' या मध्ययुगीन जहाजबांधणी– शस्त्रनिर्मिती कारखान्याचीही जागा व्यापली, तेव्हा तिथेही काही राष्ट्रीय कलामंडप आले. यंदा– २०२४ मध्ये या राष्ट्रीय कलामंडपांची संख्या ९० आहे. याखेरीज, आयोजकांतर्फे एक मोठ्ठं 'मध्यवर्ती प्रदर्शन', अशी या बिएनालेची रचना असते.

आता २०१९ मधल्या, भारताच्या पहिल्यावहिल्या 'राष्ट्रीय' सहभागाबद्दल. आर्सेनालेमधली मोक्याची जागा आपल्या देशाला मिळाली होती. त्या प्रशस्त गोदामवजा जागेच्या एका भिंतीवर अनेक लाकडी खडावांचं एक मांडणशिल्प जी. आर. इरण्णा यानं केलं होतं, ते तर अख्ख्या बिएनालेतला एक 'सेल्फी पॉइंट' ठरलं होतं!



शकुंतला कुलकर्णी, जितीश कलाट, अतुल दोडिया या मुंबईकर कलावंतांखेरीज असीम पुरकायस्थ, जिजी स्कारिआ यांचाही सहभाग इथं होता आणि 'नकोसे' झालेले मकबूल फिदा हुसेन तसंच स्त्रीवादी घटित–कलाकार (परफॉर्मन्स आर्टिस्ट) रूमाना हुसेन या दोघा – एकमेकांशी कोणताही कौटुंबिक संबंध नसलेल्या पण दोघाही दिवंगत– कलावंतांच्या कामाच्या प्रतिमा होत्या. अशा नव्याजुन्या कलाकृतींना जोडणारा धागा होता– महात्मा गांधी! गांधीजींच्या १५० व्या जयंतीवर्षांनिमित्त या कलाकृती निवडण्यात आल्या होत्या. साधेपणा, भारतीयता अशा व्यापक कल्पनांबरोबरच गांधीजींची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष (खडावांमधून प्रतीत होणारी दांडीयात्रा..) प्रतिमा ही भारतीय कलामंडपाचं केंद्रस्थान होती. महत्त्वाचं म्हणजे 'किरण नाडर म्युझियम ऑफ आर्ट' (केएनएमए) या खासगी संग्रहालयानं सरकारी 'राष्ट्रीय आधुनिक कला संग्रहालय' (एनजीएमए दिल्ली) तसंच सांस्कृतिक कार्य खातं आणि 'फिक्की' या उद्योजक संघटनेचा सांस्कृतिक विभाग अशांच्या सहकार्यानं हे जुळवून आणलं होतं. 'एचसीएल' या बडय़ा संगणक कंपनीचा वरदहस्त असलेल्या 'केएनएमए'ला पुढेही हे करत राहाणं अजिबात अशक्य नव्हतं. पण कुठं माशी शिंकली कुणास ठाऊक. एक तर्क अत्यंत अनधिकृतपणे लढवता येतो तो असा की, 'मन की बात'चे शंभर भाग झाल्याबद्दल 'एनजीएमए– दिल्ली'नं गेल्या वर्षी 'जनशक्ती' हे प्रदर्शन भरवलं होतं, त्याहीसाठी दिल्लीच्या 'केएनएमए'नं मदत केली होती आणि त्यामुळे मात्र कलाक्षेत्रातले अनेक भारतीय 'केएनएमए'वर नाराज झाले होते (त्यानंतरपासून या खासगी संग्रहालयाच्या निमंत्रणांना मान न देणारे काही ज्येष्ठ चित्रकार आजही आहेत). काहीही असो.. सन २०१९ मधलं 'इंडिया पॅव्हिलियन'– भारत कलामंडप– हे 'खासगी–सरकारी भागीदारी'चं उत्तम उदाहरण ठरलं असताना त्याची पुनरावृत्ती मात्र होऊ शकली नाही.

### भारतीय होते आणि आहेतही!

एकटय़ादुकटय़ा भारतीय चित्रकारांची निवड मात्र व्हेनिसच्या बिएनालेतल्या मध्यवर्ती प्रदर्शनासाठी सातत्यानं होत राहिली आहे. फ्रान्सिस न्यूटन सूझांचा समावेश १९५४ सालच्या २७ व्या बिएनालेत होता, तर १९६२ सालच्या ३१ व्या बिएनालेत तुलनेत अधिक भारतीय चित्रकार होते, त्यांत ना. श्री. बेन्द्रे, क्रिशन खन्ना, बिरेन डे यांचाही सहभाग होता. या बिएनालेला प्रचंड प्रतिष्ठा मिळू लागल्यानंतर, एकविसाव्या शतकात रियाज कोमू, सुनील गावडे, शिल्पा गुप्ता यांचा मध्यवर्ती प्रदर्शनातला सहभाग लक्षणीय ठरला होता. याखेरीज, बिएनालेच्या काळात व्हेनिसमध्येच अन्यत्र 'कोलॅटरल इव्हेन्ट'म्हणून लागलेल्या प्रदर्शनांत आजवर भारतीय सहभागी होते.

यंदा मात्र 'अरावनी आर्ट प्रोजेक्ट' या तृतीयपंथी कला–समूहासह वस्त्रकलावंत मोनिका कोरिया, दिवंगत रंगचित्रकार अमृता शेरगिल, जामिनी रॉय, भूपेन खक्कर, रामकुमार, बी. प्रभा, रझा आणि सूझा अशा सर्वाधिक भारतीयांची निवड झाली आहे. पण प्रसिद्धी करूनही भारताचा कलामंडप मात्र नाही. अर्थात यंत्रणांकडून प्रसिद्धी काय, होतच असते म्हणा.. त्याचं काय एवढं!

# या लोकांसाठी शुभ राहील वर्षातील पहिले सूर्यग्रहण




मुंबई, २० एप्रिल : गुरुवार, २० एप्रिल २०२३ रोजी वर्षातील पहिले सूर्यग्रहण होणार आहे. या दिवशी चंद्र पृथ्वी आणि सूर्याच्या मध्ये येतो, त्यामुळे पृथ्वी छाया पडते. या वेळी लोक देवाचे नामस्मरण करतात, कामे वर्ज्य असतात. चला तर मग जाणून घेऊया भारतात पहिलं सूर्यग्रहण केव्हा आणि किती काळ होईल आणि त्याचा जीवनावर काय शुभ आणि अशुभ परिणाम होईल.सूर्यग्रहण कधी होईल? २० एप्रिल २०२३ रोजी ७.४ मिनिटांपासून सुरू होऊन १२.२९ पर्यंत राहील. वर्षातील पहिले सूर्यग्रहण भारतात दिसणार नसल्याने त्याचे सुतक पाळण्याची गरज नाही.सूर्यग्रहणाचा शुभ प्रभाव वर्षातील पहिले सूर्यग्रहण वृषभ, मिथुन आणि धनु राशीच्या लोकांसाठी भाग्याचे ठरेल. वृषभ राशीच्या लोकांना पहिल्या सूर्यग्रहणानंतर नवीन नोकरी मिळू शकते. जुने कर्ज फेडू शकाल. जीवनात सुख-शांती नांदेल. दुसरीकडे, मिथुन राशीच्या लोकांना काही मोठ्या प्रकरणात दिलासा मिळेल. संतती सुख मिळेल. या सूर्यग्रहणामुळे धनु राशीच्या लोकांना आर्थिक लाभ होईल. तुम्हाला प्रतिष्ठा मिळेल, उत्पन्नात वाढ होईल.सूर्यग्रहणाचे अशुभ परिणाम सूर्यग्रहणादरम्यान सूर्य मेष राशीत राहील. त्यामुळेच त्याचा विशेष प्रभाव पडेल. यासंदर्भात मेष राशीच्या लोकांच्या करिअरमध्ये गोंधळाची परिस्थिती असू शकते. सिंह राशीच्या लोकांवरही सूर्यग्रहणाचा विपरीत परिणाम होणार आहे. शिक्षण आणि करिअरच्या क्षेत्रात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागू शकते. कन्या राशीच्या लोकांना मानसिक त्रास सहन करावा लागतो. या काळात आपल्या भाषेवर आणि रागावर संयम ठेवण्याची गरज आहे.

# उत्तम चवीसोबत आरोग्यही राखायचे आहे? ट्राय करा डोंगराळ प्रदेशातील 'या' भाज्या

मुंबई, २० एप्रिल : सध्याच्या काळात आपल्याला आपले आरोग्य उत्तम राखणे जरा अवघड होत आहे. कारण आपली बदलती जीवनशैली आणि अपुरे पोषण. हल्ली धावपळीमध्ये आपण पौष्टिक अन्न कमी प्रमाणात खातो आणि जेवणासाठी आपण पुरेसा वेळही देत नाही. त्यामुळे आपल्या आरोग्यावर त्याचा परिणाम होत आहे. मात्र आपल्या तब्येतीची होणारी ही हेळसांड आपण थांबवू शकतो. आरोग्यासाठी फायदेशीर असणारे काही पदार्थ जर तितकेच चविष्ट असतील तर खायला सर्वांना नक्कीच आवडतात. आज आम्ही तुम्हाला डोंगराळ प्रदेशातील अशाच काही भाज्यांबद्दल सांगणार आहोत. ज्या तुमच्या जिभेची चव तर वाढवतीलच पण त्यासोबतच तुमच्या आरोग्यासाठीही खूप फायदेशीर ठरतील. डोंगराळ प्रदेशातील काही भाज्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहेत. ऑनलाईन पद्धतीने त्यांची खरेदी आता अगदी सोपे झाले आहे. झी न्यूजने दिलेल्या वृत्तानुसार, ऋखचड हॉस्पिटल ग्रेटर नोएडा येथील प्रसिद्ध आहारतज्ञ डॉ. आयुषी यादव यांनी या भाज्यांबद्दल माहिती दिली आहे.बुरशीच्या फुलांपासून बनलेली भाजी बुरशीच्या फुलांना आयुर्वेदामध्ये खजिना मानले जाते, त्यात लोह, कॅल्शियम आणि झिंक सारखे महत्त्वाचे पोषक तत्व असतात. जे पोटाचे विकार दूर करण्यास मदत करतात.



या फुलांची भाजी अतिशय चविष्ट असते. तशीच ती सरबत आणि चटणीच्या स्वरूपातही खाता येते.लंकू लंकू ही अशीच एक भाजी आहे. जी हृदयाच्या आरोग्यासाठी उत्तम मानली जाते. ही भाजी खाल्ल्याने हाय ब्लड प्रेशर, हाय कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते आणि त्यामुळे हृदयविकाराचा धोका नसतो. यामध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन के, फायबर, प्रोटीन आणि फोलेट असे अनेक महत्त्वाचे पोषकतत्व असतात. ही भाजी खाल्ल्याने वृद्धत्वाच्या येणाऱ्या खुणाही कमी होतात.लिंगडी लिंगडी हे अँटिऑक्सिडंट्स आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिड पोटॅशियम आणि लोहाचा समृद्ध स्रोत आहे, याला डोंगरात 'कासरोड' असेही म्हणतात. हे पचनासाठी सर्वोत्तम अन्न मानले जाते, ते खाल्ल्याने पोटात कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, तसेच त्वचेवरील पुरळही नाहीसे होतात.

# ही छोटी छोटी पानं आहेत खूप फायद्याची, कॅन्सर, हृदयविकारासह ५ आजारांपासून करतात बचाव



मुंबई, २० एप्रिल : रोग टाळण्यासाठी औषधी वनस्पती प्राचीन काळापासून वापरल्या जात आहेत. यामुळे अनेक गंभीर आजारांपासून दूर राहण्यास मदत होते. तुळशीच्या रोपाला हिंदू धर्मात अत्यंत पवित्र मानले जाते आणि तिची पूजा केली जाते. बहुतेक घरांच्या अंगणात तुळशीचे रोप दिसेल. तुळशीमध्ये अनेक औषधी गुणधर्म असतात आणि त्याच्या पानांचे सेवन केल्यास अनेक आजारांपासून आराम मिळतो.तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की तुळशीच्या पानांमध्ये असलेले व्हिटॅमिन्स, मिनरल्स आणि अँटीऑक्सिडंट्स तुम्हाला अनेक धोकादायक आजारांपासून वाचवण्यात मदत करतात. अनेक संशोधनांतूनही ही गोष्ट सिद्ध झाली आहे. आज आम्ही तुम्हाला तुळशीच्या पानांचे सेवन केल्याने होणारे फायदे सांगणार आहोत.वेबएमडीच्या रिपोर्टनुसार, तुळशीमध्ये अनेक जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात. ल्युटीन, झेक्सॅन्थिन, बीटा-कॅरोटीन आणि बीटा-क्रिप्टोक्सॅन्थिन यांसारखे अँटिऑक्सिडंट देखील असतात. हे सर्व अँटिऑक्सिडंट्स आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहेत. तुळशीचे सेवन करायचे असेल तर नेहमी ताज्या पानांचे सेवन करावे. पाने सुकल्यावर त्यातील फायदेशीर घटक देखील गायब होतात. तुळशीच्या पानांमध्ये कॅल्शियम, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन के, मँगनीज, मॅग्नेशियम, लोह, जस्त आणि पोटॅशियम यांसारखे पोषक घटक आढळतात. हे सर्व घटक शरीराला शक्ती देतात.तुळशीची पानं खाण्याचे ५ मोठे फायदे - तुळशीमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स शरीरातील फ्री रॅडिकल्सशी लढतात आणि पेशींना होणारे नुकसान टाळतात.- तुळशीतील फायटोकेमिकल्स विविध प्रकारचे कर्करोग रोखण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात.- तुळशीच्या पानांमध्ये असलेले पोषक तत्व रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉल कमी करतात, ज्यामुळे हृदयविकारापासून बचाव होतो.- तुळशीच्या पानांचे सेवन केल्याने मानसिक आरोग्य चांगले राहते, असे अनेक संशोधनातून समोर आले आहे.- तुळशीच्या पानांमध्ये बॅक्टेरियाविरोधी गुणधर्म असतात. यामुळे श्वसन, मूत्र, पोट आणि त्वचेचे संक्रमण टाळता येते.मधुमेह नियंत्रणात करते तुमच्या आहारात तुळशीचा समावेश केल्यास रक्तातील साखरेचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. मधुमेह असलेल्या उंदरांवर केलेल्या अभ्यासात असे दिसून आले आहे की, तुळशीचा अर्क खाल्ल्याने त्यांच्या रक्तातील साखर कमी होण्यास मदत होते. उच्च रक्तातील साखरेच्या दीर्घकालीन परिणामांवर उपचार करण्यासाठी देखील तुळशी उपयुक्त ठरू शकते. मधुमेहाची समस्या असलेल्या लोकांसाठी तुळशीचे सेवन खूप फायदेशीर ठरू शकते.

# तुम्ही कारमध्ये कॅन्सर घेऊन तर फिरत नाही ना? तज्ज्ञांनी सांगितले कार फ्रेशनरचे सत्य

मुंबई, १९ एप्रिल : कारमध्ये लावलेले फ्रेशनर सर्वांनाच आवडते, पण तुम्हाला माहित आहे का? हे फ्रेशनर तुम्हाला आजारी पाडत आहे. हे फ्रेशनर तुम्हाला अस्थमा सोबतच कॅन्सरसारखे आजारही देऊ शकते. तुमच्या फुफ्फुसांना इजा होऊ शकते. हे अगदी खरे आहे कारण चीन आणि अमेरिकेतील संशोधकांनी नुकताच एक अभ्यास केला आहे.या अभ्यासादरम्यान, संशोधकांना १२ दिवस पार्क केलेल्या कारमध्ये कॅन्सर निर्माण करणाऱ्या रसायनांची पातळी मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे आढळले. जंतुनाशक आणि गॅस स्टोव्हमध्ये आढळणारे संयुग ज्याला फॉर्मल ॲल्डिहाइड म्हणतात. त्यात तो सापडतो. हे विशेषतः कारमध्ये वापरल्या जाणार्या फ्रेशनर्सच्या उपस्थितीपासून उद्भवले आहे.हे संशोधन समोर आल्यानंतर न्यूज१८ लोकलने किंग जॉर्ज मेडिकल युनिव्हर्सिटीच्या फिजिओलॉजी विभागाचे प्रमुख प्रोफेसर नरसिंग वर्मा यांच्याशी चर्चा केली. त्यामुळे रुम फ्रेशनर आणि कार फ्रेशनर हे दोन्ही आरोग्यासाठी हानिकारक असल्याचे त्यांनी सांगितले. हे संशोधन बरोबर आहे कारण यापूर्वीही यावर चर्चा झाली आहे.रूम फ्रेशनर आणि कार फ्रेशनरमध्ये सुगंध आणण्यासाठी रसायनांचा वापर केला जातो. ही रसायने आपल्या शरीरात प्रवेश करून केवळ शरीरालाच नव्हे तर विविध अवयवांनाही हानी पोहोचवतात. एवढेच नाही तर ही रसायने फुफ्फुसही खराब करू शकतात. त्यामुळे कर्करोग होऊ शकतो, हे संशोधनात सिद्ध झाले असेल, तर निश्चितच ते अत्यंत घातक आहे.लोकांनी रुम फ्रेशनर आणि कार फ्रेशनर वापरू नयेत. कारण बंद खिडक्यांमध्ये एसी चालू करून फ्रेशनर चालू केल्याने ताजी हवा कोठूनही आत येत नाही, तर पुन्हा पुन्हा एसीची तीच हवा आणि केमिकलने भरलेला सुगंध आत आणि बाहेर येईल. जे खरंच खूप धोकादायक आहे.परफ्युमदेखील घातक आहे प्रो. वर्मा यांनी सांगितले की, रूम फ्रेशनर आणि कार फ्रेशनर व्यतिरिक्त, जे लोक शरीरावर सुगंध आणण्यासाठी परफ्यूम वापरतात, ते देखील घातक आहे. श्वासाद्वारेही ते शरीरात प्रवेश करते. परफ्यूम लोकांच्या त्वचेला तर हानी पोहोचवत आहेतच. यामुळे श्वासोच्छवासाचे आजारही होत आहेत.प्रोफेसर नरसिंग वर्मा यांनी सांगितले की, जर लोकांना कारमध्ये बसण्यात जास्त त्रास होत असेल किंवा त्यातून दुर्गंधी येत असेल तर कार स्वच्छ ठेवणे हाच उत्तम मार्ग आहे. कारची काच उघडा आणि काही वेळ उन्हात उभे राहू द्या, यामुळे आतून दुर्गंधीही दूर होईल आणि याशिवाय कारमध्ये बसण्यापूर्वी तुमचे शूज पूर्णपणे स्वच्छ करा. कारमध्ये कोणतीही ओली वस्तू ठेवू नका. असे केल्यास लोकांना फ्रेशनर वापरावे लागणार नाही.



# लग्नाआधी पत्रिका का जुळवल्या जातात? यामागचं नेमकं कारण माहितीय?

मुंबई : भारतात लग्न जुळवण्याआधी एक गोष्ट आवर्जुन केली जाते, ती म्हणजे पत्रिका जुळवणे. स्वभाव किंवा मन जुळण्यापेक्षाही भारतात पत्रिका जुळण्याला महत्व देतात. कारण ज्योतिषशास्त्र मुलगा आणि मुलीच्या पत्रिका जुळल्या तर आणि तरच ते एकत्र राहू शकतात. पण असं का केलं जातं त्याची नेमकी कारणं काय आहेत याबाबत नेहमीच अनेक प्रश्न असतात. ही एक प्रथा आहे असं सगळे लोक मानतात, पण ते कशासाठी हे अनेकांना माहिती नसतं.असे अनेक लोक आहेत, जे कुंडली किंवा पत्रिका जुळवत नाहीत, तरीही त्यांचा संसार चांगला चालतो, मग कशासाठी कुंडली मिलन करायचं असाही प्रश्न विचारला जातो? पण ज्योतिषशास्त्राच्या अभ्यासानुसार त्या जोडप्याचा संसार त्यांची कुंडली जुळल्यामुळेच चांगला होतो असं म्हटलं जातं.इतर अभ्यासाप्रमाणे यातही काही गणितं मांडलेली असतात. त्याचा विचार आणि अभ्यास करूनच पाहिलं जातं की दोघांचे गुणमिलन होतं की नाही.


१. लग्न किती काळ टिकेल दोन व्यक्तींचा स्वभाव आणि परिस्थिती सहसा कुंडलीवरून जाणून घेतली जाऊ शकते. त्यामुळे मुलगा आणि मुलीची कुंडली जर एकाच वेळी संकटं येणारी असेल तर नातं टिकत नाही असं म्हणतात. त्यावेळी एकाचे तरी ग्रह चांगले असावे लागतात. त्यामुळे लग्न किती काळ टिकेल हे पाहण्यासाठी कुंडली मिलन आहे की नाही ते पाहिलं जातं.

२. नातं टिकून राहण्यासाठी ज्योतिषशास्त्रानुसार प्रत्येक व्यक्तीच्या पत्रिकेमध्ये गुण आणि दोष असतात. लग्नाआधी ते पाहून घेतलेले अधिक चांगले. मंगळदोष अथवा अन्य काही दोष असल्यास, पत्रिकेनुसार पाहून पुढे नातं टिकेल की नाही याचा अंदाज घेतला जातो. मंगळ असलेल्या व्यक्ती या अति रागीट असल्याचं सहसा दिसून येतं. अशावेळी दोन्ही व्यक्तींना पुढे त्रास होऊ नये आणि नाते व्यवस्थित टिकून राहायला हवे यासाठी लग्न जुळण्याआधी पत्रिका जुळवली जाते. एकूण ३६ गुणांपैकी साधारण १८ गुण जमणे गरजेचे आहे असं ज्योतिषशास्त्रात मानलं जातं. यापेक्षा कमी गुण जुळत असल्यास, लग्न करणं योग्य नाही असंही म्हटलं जातं.

३. मानसिक आणि शारीरिक क्षमता प्रत्येक माणसाची प्रकृती आणि स्वभाव हे दोन्ही वेगळे असतात. त्यामुळे लग्न होणाऱ्या दोन व्यक्तीचे स्वभाव आणि प्रकृती एकमेकांशी जुळतात की नाही हे पाहण्यासाठी पत्रिका बघितली जाते.

४. कुटुंबाशी नाते आपण भारतात राहातो जिथे एकत्र कुटुंबपद्धती आहे. त्यामुळे व्यक्तीला संपूर्ण कुटुंबाशी पटवून घ्यावे लागते. त्यामुळे पत्रिकेवरून तुम्ही कुटुंबाशी कसे जमवून घ्याल. संतानप्राप्ती कशी होईल याचीही गणितं यातून कळू शकतात. नक्की गुण कसे जुळले जातात? प्रत्येकाचे वर्ण, गण, नाडी, तारा या सर्व गोष्टी वेगळ्या असतात आणि गुणही वेगळे असतात. त्यानुसार ज्योतिषशास्त्र अभ्यास करून याचे गुणमिलन करतात. कुठल्याही व्यक्तीच्या कुंडलीमध्ये आठ प्रकारचे गुण आणि अष्टकूटचे मिलन करण्यात येते.

१ गुण : वर्ण-जातीचे मिलन २ गुण : वैश्य-आकर्षण ३ गुण : तारा-अवधी ४ गुण : योनी-स्वभाव आणि चरित्र ५ गुण : मैत्री-एकमेकांमधील समज ६ गुण : गण-मानसिक क्षमता ७ गुण : भकोत-दुसऱ्याला प्रभावित करण्याची क्षमता ८ गुण : नाडी-संतानजन्म




# उन्हाळ्यात प्रमाणातच खा हे पदार्थ, अन्यथा वाढेल उष्माघाताचा धोका



मुंबई, १९ एप्रिल : ग्रीष्माच्या झळा आता चांगल्याच जाणवू लागल्या आहेत. राज्यातल्या अनेक भागांमध्ये तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे गेलं आहे. या उष्णतेमुळे अनेकांना उष्माघाताचा त्रास होतोय. यात काही जणांचे मृत्यूही होत आहेत. उन्हाळा सुसह्य करण्यासाठी सर्वतोपरी उपाय केले जात आहेत. उन्हाळ्यात उष्माघाताचा त्रास होऊ नये यासाठी आहारातही काही बदल केले पाहिजेत. त्याकरिता दररोजच्या जेवणातून हे ३ मसाले सध्या कमी करा.उन्हाळ्यात पोटाच्या समस्या जास्त उद्भवतात. तापमानवाढीमुळे उष्माघाताचा त्रास होण्याचा धोका असतो. उन्हाळ्यात सतत घाम येऊन शरीरातली पाण्याची पातळी झपाट्याने कमी होते. त्यामुळे पाणी किंवा द्रवपदार्थ जास्त प्यायल्याने ती पातळी योग्य राहते. चहा, कॉफीसारखी पेयं उष्णता आणि पित्त वाढवतात. त्याचबरोबर तेलकट व मसालेदार पदार्थही या काळात खाऊ नयेत असं तज्ज्ञ सांगतात. काही अन्नघटकांमुळे शरीरातली उष्णता वाढते व पर्यायाने उष्माघाताचा धोकाही वाढतो.उन्हाळ्यात प्रथिनयुक्त पदार्थ जास्त खाल्ल्याने पोटाच्या तक्रारी वाढू शकतात. त्यातही काही मसाले शरीरातली उष्णता वाढवतात. त्यामुळे असे पदार्थ या काळात आहारात कमी घ्यावेत.लाल मिरची पूड : पदार्थांमध्ये लाल तिखट जास्त असेल, तर अशा पदार्थांच्या सेवनाने छातीत व पोटात जळजळ होते. घशातही जळजळ होऊ शकते. यामुळे शरीराचं तापमान वाढतं. त्यामुळे आपल्याला अस्वस्थ वाटतं. असं जेवण जेवल्यानंतर बाहेर उन्हात गेलं, तर उष्माघाताचा त्रास होण्याचा धोका वाढतो.लसूण : लसूण अनेक चांगल्या गुणधर्मांनी युक्त असते. हिवाळ्यात लसूण जास्त प्रमाणात खाण्याचा सल्ला दिला जातो. त्यामुळे शरीरात ऊर्जा व उष्णता निर्माण होते. आरोग्यासाठी लसूण उपयुक्त असली, तरी लसूण उन्हाळ्यात काही प्रमाणात हानिकारक ठरू शकते. लसूण अतिरिक्त प्रमाणात सेवन केल्यास शरीरातली उष्णता वाढते. चयापचय क्रिया सुधारण्यास, वजन कमी करण्यासाठी लसूण उपयुक्त असली, तरी उन्हाळ्यात जास्त प्रमाणात लसूण खाल्ल्यास तोंडाला वास येणं, पित्त व क्वचितप्रसंगी रक्तस्रावही होऊ शकतो.आलं : आलं पदार्थांचा स्वाद वाढवतं; मात्र उन्हाळ्यात आल्याचा जास्त वापर करणं धोकादायक ठरू शकतं. यामुळे डायरिया होऊन शरीरातलं पाणी कमी होऊ शकतं. तसंच आल्याच्या जास्त वापरामुळे पोटाच्या समस्याही उद्भवू शकतात.

# प्रोटीनने भरपूर असलेल्या मखानासोबत वजन करा कमी, असा करा आहारात समावेश

मुंबई, १९ एप्रिल : मखाना हा एक अतिशय हलका आणि आरोग्यदायी नाश्ता आहे. जो जवळजवळ प्रत्येकालाच खायला आवडतो. चांगली गोष्ट म्हणजे त्यात पौष्टिक घटकांचे प्रमाण खूप जास्त आहे आणि जेव्हाही बाहेरचे काही खावेसे वाटेल तेव्हा त्याऐवजी मखाना खाल्यास ते आरोग्यास फायदेशीर असते. मखाना तुपात थोडे परतून घेतले तर त्यांची चव खूप छान लागते. मखाना ग्लूटेन मुक्त असल्यामुळे प्रत्येकजण त्याचे सेवन करू शकतो. त्यात प्रोटीन आणि कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण जास्त असते ज्यामुळे मखाना एक निरोगी नाश्ता आहे. मखाना वजन कमी करण्यासही मदत करते. जर तुम्हीही तुमचे वजन कमी करण्याचा प्रवास सुरू केला असेल, तर मखाना तुम्हाला वजन कमी करण्यात नक्कीच मदत करू शकतो. वजन कमी करण्यात मखनाचे फायदे - ३२ ग्रॅम मखानामध्ये सुमारे १०६ कॅलरीज असतात. त्यामध्ये कॅलरीजची संख्या खूप कमी असते आणि त्यामुळे पोटही लवकर भरते. त्यामुळे वजन कमी करण्याच्या सुरुवातीला त्याचा आहारात नक्कीच समावेश करा.- एनडीटीव्हीच्या मते, यामध्ये असलेल्या प्रोटीनमुळे ते तुम्हाला दीर्घकाळ पोट भरलेले राहण्यास मदत करते. त्यामुळे इतर पदार्थ जास्त खाणे आणि वारंवार खाणे टाळता येते.- मखानामध्ये सॅच्युरेटेड फॅटचे प्रमाण खूपच कमी असते आणि त्यामुळे ते शरीरासाठी खूप निरोगी असतात.- मखानाचा ग्लायसेमिक इंडेक्स खूप कमी आहे आणि ते रक्तातील साखर नियंत्रित करण्यास देखील सक्षम आहेत.- वजन कमी करण्यासोबतच ब्लड प्रेशर लेव्हल कमी करण्यासारख्या अनेक गोष्टींमध्ये मखाना फायदेशीर आहे.- मखाना दात आणि हाडांच्या आरोग्यासाठीदेखील चांगले आहे. यामध्ये असलेले तुरट गुणधर्म किडनीसाठीही फायदेशीर ठरतात.

- मखानामध्ये अँटी-ऑक्सिडंट आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म आढळतात.- शरीरातील जुनाट जळजळ आणि ऑक्सिडेटिव्ह तणावाने ग्रस्त असलेले लोक मखानाचे सेवन करू शकतात.- मधुमेहाच्या रुग्णांसाठीही मखाना अतिशय आरोग्यदायी आहे.- मखाना भाजून स्नॅक्स म्हणून खाऊ शकतात किंवा सॅलड्स वगैरेमध्ये घालून खाऊ शकतात.- तांदळाच्या खीरातही मखाना मिसळता येतो.



# महावितरणचा लपंडाव सुरुच नागरिकांना सुरळीत विद्युत पुरवठा करण्याची मागणी

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) किनवट तालुक्यात खेडेगाव सह शहरी भागात दिवसातून ५६ वेळा बत्तीगुल होत असल्याचे चित्र पाहून ग्राहक त्रस्त झाले आहे. किनवट येथील ३३/११ के व्ही उपकेंद्राच्या अंतर्गत येत असणाऱ्या सर्वच गावातील तसेच शहरी भागातील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. उन्हाळा सुरू होण्या पूर्वीच विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत आसल्याने अनेक ग्राहक संताप व्यक्त करत असल्याचे चित्र दिसून येत आहे.काही दिवसापासून विद्युत पुरवठा दिवसातून दहा वेळा जात होता मात्र आता दोन दिवसापासून विद्युत पुरवठा दिवसातून ५६ वेळा खंडित होत आहे. विद्युत पुरवठा कोणत्या वेळेला खंडित होईल याचा काहीही नेम नाही. अशी परिस्थिती




टी व्हि सेंटर उपकेंद्राच्या अंतर्गत असलेल्या सर्वच वीज पुरवठा रोहित्राची निर्माण झाली आहे. आली.. लाईट.. गेली.. लाईट असे काही महावितरणचे काम चालू आहे. त्यात कर्मचारी किंवा अधिकारी यांना भ्रमणध्वनी वर संपर्क केला असता 'नोट रिजेबल' वर असतात चुकून एखाद्या कर्मचारी यांना संपर्क झालाच तर उपकेंद्रातुन लाईट गेली आहे उपकेंद्रातील रोहित्र नादुरुस्त झाले आहे,काम करण्यास खूप वेळ लागतील असे ग्राहकांना उत्तरे देऊन फोन कट करतात. (आमच्या प्रतिनिधींनी यंत्र चालकाडून माहिती घेतली असता उपकेंद्रातील तीन-चार यंत्र नादुरुस्त असून आठ ते नऊ महिने होऊन गेले पण कोणतेच ठेकेदार येऊन दुरुस्तीचे काम करत नसल्याचे सांगितले. खरोखरच महावितरण कंपनीने दुरुस्तीचे काम ठेकेदारांना दिले आहे तर मग का अजून यंत्र दुरस्ती झालेली नाही. (या विषयी सहायक अभियंता किंवा उपकार्यकारी अभियंता यांनी का लक्ष दिले नाही. यात ठेकेदाराकडून या अभियंता लोकांना टक्केवारी तर मिळत नसेल ना? असे बरेच प्रश्न संतप्त नागरिक करीत आहेत.)✻ सबंधित लाईनमन यांना खंडित वीज पुरवठ्याच्या बाबत बोलले तर हे काम आमचे नसून गुत्तेदाराला काम दिले आहे. आम्हाला बोलून काहीच होणार नाही असे उत्तर मिळत असतात. अश्याने त्रस्त झालेल्या ग्राहकांनी बोलायचे तरी कोणाला? असा प्रश्न ग्राहकांना पडलेला आहे.

## व्हि.डी.एफ.स्कुल ऑफ फार्मसी लातुर महाविद्यालयाची औद्योगिक क्षेत्र भेट अंतर्गत Unichem Laboratoties Goa प्लांटला भेट




लातुर/ प्रतिनिधी :-लातूरच्या नामांकित व्हि. डी.एफ.स्कुल ऑफ फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने बी.फार्मसी तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांकरिता नुकतेच औद्योगिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

औद्योगिक क्षेत्र भेट अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गोवा येथील औद्योगिक वसाहतीमधील औषध उत्पादनात अग्रणी असलेल्या Unichem Laboratoties, Goa नामक औषध निर्माण कंपनीला भेट दिली. या औद्योगिक भेटीत विद्यार्थ्यांनी कंपनीच्या उत्पादन, गुणवत्ता, चाचणी, संशोधन व विकास, पॅकेजिंग आदी विभागाना प्रत्यक्ष भेट देऊन उपलब्ध तंत्रज्ञान आणि कार्यप्रणालीची माहिती घेतली.

विद्यार्थ्यांना फार्मसी क्षेत्रातील कंपन्या मध्ये असलेल्या तंत्रज्ञानाची व कार्यप्रणालीची माहिती व्हावी या उद्देशाने महाविद्यालयाकडून दरवर्षी आशा प्रकारच्या औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात येत असल्याचे प्राचार्य डॉ.बी.एस.वाकुरे यावेळी म्हणाले. या औद्योगिक भेटीच्या आयोजनासाठी Unichem Laboratoties, Goa येथील सर्व अधिकारी वर्गाचे सहकार्य लाभले तर आयोजनासाठी व्हि.डी.एफ.स्कुल ऑफ फार्मसी महाविद्यालयाकडून प्राचार्य डॉ.बी. एस.वाकुरे, प्रा.व्ही.बी.काळे, प्रा.एस.एस.बडे, पल्लवी मोरे, सचिन शिंदे, रमाकांत सुर्यवंशी यांनी संयोजन केले.

## लातुरात सोमवारपासून दोन दिवसीय ग्रंथोत्सवाचे आयोजन

लातूर : उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने लातूरच्या दयानंद सभागृहात सोमवार, दि. ४ व मंगळवार दि. ५ मार्च २०२४ रोजी लातूर ग्रंथोत्सव २०२३ चे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के यांनी दिली.

या ग्रंथोत्सवाचे उद्घाटन लातूरचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते सोमवारी सकाळी ११ वाजता होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे हे राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खा. सुधाकर शृंगारे , खा. ओमराजे निंबाळकर, आ.अमित देशमुख, आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. विक्रम काळे, आ. सतीश चव्हाण, आ. रमेश कराड, आ. बाबासाहेब पाटील, आ. धीरज देशमुख, आ. अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे, राज्याचे प्रभारी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी, विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राम मेकले , छत्रपती संभाजीनगरचे सहायक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर कापसे यांची उपस्थिती राहणार आहे. सोमवारी सकाळी ९ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून ग्रंथदिंडी निघेल. या ग्रंथदिंडीचे पूजन जिल्हा ग्रंथालयाचे कार्याध्यक्ष डॉ. ब्रिजमोहन झंवर, डॉ. आरती झंवर, दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड यांच्या हस्ते होईल. दुपारी वसंतराव हंकारे यांचे ' बाप समजून घेताना ' या विषयावर व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी, साहित्यिक भारत सातपुते हे राहणार आहेत. सायंकाळी ज्येष्ठ साहित्यिक फ. म . शहाजिंदे यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन होईल.

मंगळवारी सकाळी साडेदहा वाजता बालकांचे कथाकथन हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाल साहित्यिक रमेश चिल्ले हे राहणार आहेत. तसेच प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली ' वाचन आधी की लेखन आधी ' या विषयावरील परिसंवाद होणार आहे. यामध्ये चंद्रशेखर मलकमपट्टे, प्रा. राजशेखर सोलापूरे , विवेक सौताडेकर सहभागी होणार आहेत. दुपारी जी. जी. कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली कथाकथन होणार आहे. कथाकथनात धनंजय गुडसूरकर, नयना राजमाने, विलास सिंदगीकर, अंबादास केदार हे सहभागी होणार आहेत. दुपारी अडीच वाजता ' साहित्याने मला काय दिले ' या विषयावरील परिसंवाद होणार आहे. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. शेषेराव मोरे हे राहणार असून प्रमुख वक्ते म्हणून सुरेंद्र पाटील, जयद्रथ जाधव, मोहिब कादरी , अनंत कदम उपस्थित राहणार आहेत. सायंकाळी साडेपाच वाजता ग्रंथोत्सवाचा समारोप समरम्भ होणार आहे. समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे हे राहणार आहेत. यावेळी सहायक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, जिल्हा कोषागार अधिकारी उज्वला पाटील, जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप, जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. या ग्रंथोत्सवात लातूर जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक ग्रंथालयांचे पदाधिकारी, ग्रंथपाल, कर्मचारी व ग्रंथप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन ग्रंथोत्सव समन्वय समिती व ग्रंथोत्सव संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## संभाजी महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा

मुरुड/महेंद्र आल्टे : येथील संभाजी कॉलेज येथे विज्ञान विभागातर्फे राष्ट्रीय विज्ञान दिवस दि. २९/०२/२०२४ रोजी उत्सवापूर्वक साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम, प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. हरिदास फेरे (स्व. वसंतराव काळे कला महाविद्यालय, ढोकी) उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. डी.एम.रणदिवे, इंग्रजी विभागाचे प्रा. एम.बी.गायकवाड, मराठी विभाग प्रमुख प्रा. सौ पी.बी. महाजन, भूगोल विभागाचे प्रा.जी.एल.जाधव हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. हरिदास फेरे यांनी विज्ञान दिनानिमित्त विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी आपल्या दैनंदिन जीवनात विज्ञानाचे महत्त्व पटवून



दिले, ज्यामध्ये टेलिफोन, वीज, वैद्यकीय उपकरणे इत्यादी संशोधनाचे महत्त्व सांगितले. त्याचबरोबर त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तिपत्रकाचे अनावरण करण्यात आले. यामध्ये ऋतुजा चव्हाण, मेहेक शेख, वैभव देशमुख, नम्रता माने, राजनंदिनी नाडे इत्यादी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. तसेच इतिहास विभाग प्रमुख डॉ. डी.एम.रणदिवे यांनी देखील मार्गदर्शन केले. त्यामध्ये त्यांनी कोरोना महामारीवर अंधश्रद्धे ऐवजी विज्ञानाच्या मदतीने कशी मात केली हे देखील सांगितले. आपण विज्ञानाच्या मदतीने कोरोनाच्या संकटातून बाहेर पडू शकलो याचे श्रेय अधिकांश प्रमाणात विज्ञानातील संशोधनाला दिले पाहिजे असेही मत त्यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गरड ऐश्वर्या यांनी केले तर विज्ञान विभाग प्रमुख प्रा.जाधव पी.एम.यांनी आभार मानले. या कार्यक्रमास विज्ञान विभागातील सर्व प्राध्यापक व प्रतिनिधींचे सहकार्य लाभले, तसेच विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

## जिल्ह्यातील संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेवून पाणी पुरवठ्याचे योग्य नियोजन करावे- क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे

लातूर, दि. २ : जिल्ह्यात गतवर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने जिल्ह्यातील प्रकल्पांमध्ये पुरेशा प्रमाणात पाणीसाठा झालेला नाही. त्यामुळे काही भागात आतापासूनच पाणी टंचाई जाणवण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील एकूण पाणीसाठा लक्षात घेवून पाणी पुरवठ्याचे सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी जिल्हा प्रशासनाला दिल्या आहेत. लातूर शहरातला पाणी पुरवठा करणाऱ्या मांजरा प्रकल्पातील पाणीसाठा पिण्याकरिता आरक्षित करण्यात आला आहे. त्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. लातूर शहर महानगरपालिकेने या पाणीसाठ्यानुसार शहरातील पाणी पुरवठ्याचे सूक्ष्म नियोजन करून त्यानुसार अंमलबजावणी करावी. शहरी भागातील पाणीपुरवठ्यासाठी इतर पर्यायी उपाययोजना सज्ज ठेवाव्यात, असे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. बनसोडे यांनी सांगितले. ग्रामीण भागात पाणी टंचाईवर मात करण्यासाठी जिल्हा परिषदेने आतापासूनच गावनिहाय उपाययोजनांची यादी तयार करावी. तसेच पाणी टंचाई निर्माण झालेल्या गावांमध्ये तातडीने उपाययोजना हाती घ्याव्यात. कोणतेही गाव पाणी टंचाई उपाययोजनेपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे ना. बनसोडे यावेळी म्हणाले.

# पत्रकारांनी समाजाच्या प्रश्नांची काळजी घ्यावी; आरोग्याची काळजी मी घेतो-आ. रमेशअप्पा कराड

लातूर :- लोकशाहीत समाजाच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यात पत्रकारांचे मोठे योगदान आहे. पत्रकारांनी समाजाच्या सर्वांगीण प्रश्नांची काळजी घ्यावी. जिल्ह्यातील पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबाच्या आरोग्याची काळजी एमआयटीच्या यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयाच्या माध्यमातून आरोग्य सुरक्षा कवच देऊन मी घेतो असे प्रतिपादन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

व्हॉइस ऑफ मीडिया आणि यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या जिल्ह्यातील पत्रकारांच्या आरोग्य शिबिराचा शुभारंभ आणि आयुष्यमान भारत आरोग्य कार्डचे वितरण आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते शनिवारी झाले. यावेळी व्हाईस ऑफ मीडिया या पत्रकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, एमआयटी मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. एन. पी. जमादार, राष्ट्रीय महासचिव दिव्या भोसले, मराठवाडा विभागीय अध्यक्ष विजय चोरडिया, मराठवाडा संघटक बालाजी फड, लातूर जिल्हाध्यक्ष



संगम कोटलवार, इलेक्ट्रॉनिक्स विभाग अध्यक्ष निशांत भद्रेश्वर, साप्ताहिक विभाग अध्यक्ष विष्णू अष्टेकर, शैक्षणिक विभाग अध्यक्ष चेतन कात्रे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, पत्रकारांनी जे चांगले आहे ते चांगले म्हणून आणि वाईट आहे ते वाईट म्हणून समाजास सांगितले पाहिजे. मात्र चांगल्याचे वाईट आणि वाईटाचे चांगले अशी विसंगती पत्रकारांच्या हातून होऊ नये अशी अपेक्षा व्यक्त करून व्हॉइस ऑफ मीडियाच्या माध्यमातून पत्रकारांच्या हिताचे काम व त्यांच्या प्रश्नाची सोडवणूक केली जात असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

पत्रकारांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी शासन पातळीवर जिथे जिथे मदत लागेल तिथे तिथे मी स्वतः पुढाकार घेऊन मदत करेल अशी ग्वाही देऊन आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील ७० हजार कुटुंबांना एमआयटीच्या यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयाच्या माध्यमातून त्यागमूर्ती प्रयागअक्का कराड आरोग्य सुरक्षा योजनेअंतर्गत दत्तक घेऊन त्यांच्या कुटुंबाच्या आरोग्याची काळजी घेतली जात आहे. त्याच धर्तीवर जिल्ह्यातील पत्रकारांना आरोग्य सुरक्षा कवच दिले जाईल असे बोलून दाखविले. देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांनी गेल्या दहा वर्षात गरजू लाभार्थ्यांना विविध योजनेच्या माध्यमातून न्याय देण्याचे काम केले असल्याची माहिती त्यांनी यावेळी बोलताना दिली.

पंचसूत्री कार्यक्रमाच्या माध्यमातून देशातील पत्रकारांना न्याय देण्याचे काम होत आहे. पत्रकाराचे हे संघटन आता ४० देशात पोहोचले आहे येत्या दोन वर्षात १९५ देशात पोहोचेल असे सांगून वाईस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यावेळी बोलताना म्हणाले की, लढा आणि चळवळ याला कृतिशीलतेची जोड दिल्यामुळे हा प्रवास विस्तारत असल्याचे सांगून पत्रकारांच्या घर बांधणीचा प्रकल्प लातूर शाखेने हाती घ्यावा अशी सूचना केली.

याप्रसंगी एमआयटीचे डॉ. एन. पी. जमादार, राष्ट्रीय महासचिव दिव्या भोसले, मराठवाडा अध्यक्ष विजय चोरडिया यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते पुरस्कार प्राप्त पत्रकार प्रशांत शेटे, संग्राम वाघमारे, विनोद नीला, विकास स्वामी यांचा यथोचित सत्कार केला. आरोग्य शिबिरात उपस्थित दोनशेहून अधिक पत्रकारांची तज्ञ डॉक्टरांमार्फत तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सितम सोनवणे यांनी केले तर शेवटी जिल्हा कार्याध्यक्ष शहाजी पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास व्हाईस ऑफ मीडिया या पत्रकार संघटनेचे जिल्हा, तालुका पदाधिकारी, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE